| MHNS140000582024 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | ०८/०१/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | :- | ०८/०१/२०२४ |
| | निकाल दिनांक | :- | १०/०३/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | | ०२ ०२ ०२ |

**<u>दिंडोरी येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, जि. नाशिक यांचे न्यायालयात,</u>**

**( पिठासीन अधिकारी श्रीमती एस. सी. निर्मळे)**

**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – १० मार्च, २०२६**

**( संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३८/२०२४, नि.क्र.१६)**

**गुन्हा नोंद क्र.४९२/२०२३, दिंडोरी पोलीस स्टेशन**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>दिंडोरी पोलीस स्टेशन, ता. दिंडोरी, जि. नाशिक. |
| अभियोग पक्षातर्फे | | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर. बी. वळवी** |
| आरोपी | | **घनश्याम गोवर्धन चव्हाण,**<br>वय - ४२ वर्ष, व्यवसाय -<br>रा. विठ्ठलनगर, दिंडोरी,<br>ता. दिंडोरी, जि. नाशिक. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | विधीज्ञ श्री. पी. एस. घोरपडे |

**<u>भाग-ब</u>**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | ०२/१०/२०२३ |
| गुन्हा दाखल दिनांक | :- | ०२/१०/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | :- | ०८/०१/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०९/०१/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | ०८/१२/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १०/०३/२०२६ |
| शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक असल्यास | :- | निरंक. आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपी चे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची तारिख | दोषारोप कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | घनश्याम गोवर्धन चव्हाण | -- | ०९/०१/२०२४ | मु.प्रो.का. कलम ६५(ई) | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग-क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/आरोपी पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| **सा.क्रं.** | **साक्षीदाराचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| १. | गणेश मल्हारी गांगुर्डे | पंच साक्षीदार | पी.डब्ल्यु.१ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| **सा.क्रं.** | **साक्षीदाराचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**क.न्यायालयीन साक्षीदार**

| **सा.क्रं.** | **साक्षीदाराचे नांव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष/आरोपी /न्यायालयीन पुराव्यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ब. आरोपीतर्फे पुरावा**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन पुरावा**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| **अ.क्रं.** | **मुद्देमाल क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य
**(दिनांक १०/०३/२०२६ रोजी घोषित केले)**

**अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे आहे -**

दिनांक ०२/१०/२०२३ रोजी १५.३० वाजेचे सुमारास दिंडोरी गांवात, श्री.स्वामी समर्थ केंद्रासमोर, एका पत्राचे टपरीमध्ये, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे आरोपीने त्याचे ताब्यात विनापरवाना बेकायदा प्रिन्स संत्रा देशी दारु नावाच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या प्रत्येकी किंमत ७०/- रुपये किंमत असलेल्या काचेच्या १३ सिलबंद बाटल्या एकुण किंमत रुपये ९१०/-, प्रिन्स संत्रा देशी दारु नावाच्या प्रत्येकी ९० मिली मापाच्या प्रत्येकी किंमत ३५/- रुपये किंमत असलेल्या २० सिलबंद प्लॅस्टीक बाटल्या एकुण किंमत रुपये ७००/- व प्रिन्स संत्रा जी.एम.नावाची देशी दारु प्रत्येकी १८० मिली मापाच्या प्रत्येकी किंमत ७०/- रुपये किंमत असलेली १ सिलबंद काचेची बाटली किंमत रुपये ७०/- असा एकुण १६८०/- रुपये किंमतीचा प्रोव्हीबिशनचा गुन्ह्याचा माल विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःचे कब्जात बाळगतांना मिळुन आला. जप्त मुद्देमालातुन प्रत्येकी १८० मिली क्षमतेची व ९० मिली क्षमतेची एक-एक बॉटल केमिकल सॅम्पलसाठी वेगळी काढुन त्यावर पोलीस व पंचांचे सहीचे कागदी सिल जागीच लावुन सविस्तर पंचनामा केला. त्यानंतर फिर्यादीने दिंडोरी पोलीस स्टेशनला येवुन आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) नूसार रितसर फिर्याद दाखल केली.

**०२.** आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा अपराध क्र.४९२/२०२३ अन्वये नोंद करण्यात आला. त्यानंतर तपासिक अधिकारी श्रीधर ए. नेटावटे, पो.उप.निरीक्षक, दिंडोरी पोलीस

स्टेशन यांनी गुन्हयाचा तपास केला व गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

**०३.** आरोपीविरुध्द नि. क्र.८ वर दोषारोप नोंदविला असता आरोपीने गुन्हा नाकबुल केला व न्याय चौकशीची मागणी केली. आरोपीविरूध्द सबळ पुरावा पटलावर न आल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसारचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**०४.** अभियोग पक्षाचे कथन, साक्षीदाराचे जबाब, दाखल झालेले दस्तऐवज व दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणेमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने असे शाबीत केले का की, दिनांक ०२/१०/२०२३ रोजी १५.३० वाजेचे सुमारास दिंडोरी गांवात, श्री.स्वामी समर्थ केंद्रासमोर, एका पत्राचे टपरीमध्ये, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे आरोपीने त्याचे ताब्यात विनापरवाना बेकायदा प्रिन्स संत्रा देशी दारु नावाच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या प्रत्येकी किंमत ७०/- रुपये किंमत असलेल्या काचेच्या १३ सिलबंद बाटल्या एकुण किंमत रुपये ९१०/-, प्रिन्स संत्रा देशी दारु नावाच्या प्रत्येकी ९० मिली मापाच्या प्रत्येकी किंमत ३५/- रुपये किंमत असलेल्या २० सिलबंद प्लॅस्टीक बाटल्या एकुण किंमत रुपये ७००/- व प्रिन्स संत्रा जी.एम.नावाची देशी दारु प्रत्येकी १८० मिली मापाच्या प्रत्येकी किंमत ७०/- रुपये किंमत असलेली १ सिलबंद काचेची बाटली किंमत रुपये ७०/- असा एकुण १६८०/- रुपये किंमतीचा प्रोव्हीबिशनचा गुन्ह्याचा माल स्वतःच्या फायद्यासाठी अवैधरित्या विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःचे कब्जात बाळगतांना मिळुन आला ? | नकारार्थी |
| २) | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ व २ करीता** -

**०५.** आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाला हे सिध्द करणे आवश्यक आहे की, दिनांक ०२/१०/२०२३ रोजी १५.३० वाजेचे सुमारास दिंडोरी गांवात, श्री.स्वामी समर्थ केंद्रासमोर, एका पत्राचे टपरीमध्ये, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे आरोपीने त्याचे ताब्यात विनापरवाना बेकायदा प्रिन्स संत्रा देशी दारु नावाच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या प्रत्येकी किंमत ७०/- रुपये किंमत असलेल्या काचेच्या १३ सिलबंद बाटल्या एकुण किंमत रुपये ९१०/-, प्रिन्स संत्रा देशी दारू नावाच्या प्रत्येकी ९० मिली मापाच्या प्रत्येकी किंमत ३५/- रुपये किंमत असलेल्या २० सिलबंद प्लॅस्टीक बाटल्या एकुण किंमत रुपये ७००/- व प्रिन्स संत्रा जी.एम.नावाची देशी दारु प्रत्येकी १८० मिली मापाच्या प्रत्येकी किंमत ७०/- रुपये किंमत असलेली १ सिलबंद काचेची बाटली किंमत रुपये ७०/- असा एकुण १६८०/- रुपये किंमतीचा प्रोव्हीबिशनचा गुन्ह्याचा माल स्वतःच्या फायद्यासाठी अवैधरित्या विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःचे कब्जात बाळगतांना मिळुन आला.

**०६.** दोषारोपपत्रात नमुद केलेला आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने साक्षीदार क्र.१ गणेश मल्हारी गांगुर्डे यांची साक्ष नोंदविली. सदरचा साक्षीदार हा जप्ती पंचनाम्यावरील पंच असुन त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी त्यांना बोलाविले नव्हते. त्यांना पंचनामा दाखविण्यात आला असता त्यावर त्याची सही आहे परंतु, त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे कथक केले आहे. सदरचा साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य होईल अशी साक्ष देत नसल्यामुळे अभियोगपक्षाने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, त्यात देखील सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास मदत होईल अशी कोणतीही साक्ष दिली नाही.

**०७.** अभियोगपक्षास संधी देवुनही फिर्यादी, तपासी अंमलदार, दुसरा पंच यांची

साक्ष नोंदवण्यात आलेली नाही. अभियोग पक्षाचे सा.क्र.१ गणेश मल्हारी गांगुर्डे हे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच असुन त्यांनी त्यांच्या जबाबामध्ये आरोपीवरील आरोप सिध्द होईल असा कोणताही पुरावा दिलेला नाही. या व्यतिरिक्त अभियोग पक्षास फिर्यादी, तपासिक अंमलदार व इतर महत्वाचे साक्षीदार तपासण्यात अपयश आले आहे. अभियोग पक्षातर्फे इतर कुठलाही असा पुरावा देण्यात आलेला नाही ज्यावरून आरोपीविरूध्द लावलेला आरोप सिध्द होउ शकेल. त्यामुळे आरोपीविरुध्द लावलेला आरोप सिद्व झालेला नाही.

**०८.** अभियोग पक्षाने आरोपीकडून जप्त केलेल्या मुद्देमालातुन प्रत्येकी १८० मिली क्षमतेची व ९० मिली क्षमतेची एक-एक बॉटल रासायणीक विश्लेषणासाठी राखून ठेवल्या मात्र रासायनिक विश्लेषनाचा अहवाल अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे जप्त मुद्देमालामध्ये दारु अस्तित्वात होती असा निष्कर्ष काढणे न्यायोचीत ठरणार नाही. अभियोग पक्षातर्फे इतर कुठलाही असा पुरावा देण्यात आलेला नाही ज्यावरून आरोपीविरूध्द लावलेला आरोप सिध्द होउ शकेल.

**०९.** सबब, अभियोग पक्ष हा आरोपीविरुध्द गुन्हा निःसंशयरित्या शाबीत करण्यास समर्थ ठरला नाही. त्यामुळे आरोपीवर दोषारोपत्राप्रमाणे लावलेला आरोप सिध्द होऊ न शकल्यामुळे व आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपीचा निकाल आरोपीच्या गैरहजेरीत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५३(६) अन्वये देण्यात येतो. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करिताः-</u>**

**१०.** मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष विचारात घेता, अभियोगपक्ष आरोपीविरुध्दचे गुन्हे शाबित करु शकलेला नाही. आरोपीला संशयांचा फायदा देण्यात येतो. सबब, आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी घनश्याम गोवर्धन चव्हाण यांची महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५(ई) या गुन्ह्यामधुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा बंधपत्र च जामीन कदबा रदद् करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल देशी दारु हा अपील कालावधीनंतर योग्य त्या कार्यवाहीसाठी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, दिंडोरी यांचेकडे पाठविण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

सही/-
(एस. सी. निर्मळे)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
दिंडोरी.

दिनांक – १०/०३/२०२६